# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः26.10.2025** **वारःरविवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज 22 व्या आसियान-भारत शिखर परिषदेला दूरस्थ पद्धतीनं उपस्थित राहणार
2. येत्या दोन वर्षात मोबाईल फोनच्या सर्व सुट्या भागांचं उत्पादन भारतात होईल, इलेक्ट्रॉनिक्स मंत्री आश्विनी वैष्णव यांचा विश्वास
3. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मन की बात मधून श्रोत्यांशी संवाद साधणार
4. भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यानचा 50 षटकांचा तिसरा क्रिकेट सामना भारतानं जिंकला आणि
5. ज्येष्ठ अभिनेते सतीश शहा यांचं निधन

**आसियान-भारत**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज 22 व्या आसियान-भारत शिखर परिषदेला दूरस्थ पद्धतीनं उपस्थित राहणार आहेत. आसियान-नेत्यांबरोबर संयुक्तपणे, पंतप्रधान मोदी आसियान-भारत संबंधांमधील प्रगतीचा आढावा घेतील आणि व्यापक धोरणात्मक भागीदारी मजबूत करण्यासाठीच्या उपक्रमांवर चर्चा करतील असं परराष्ट्र मंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे. आसियान देशांशी चांगले संबंध प्रस्थापित करणे हे भारताच्या ॲक्ट ईस्ट पॉलिसी आणि इंडो-पॅसिफिक व्हिजन मधील एक महत्त्वाचा टप्पा आहे. परराष्ट्र मंत्री डॉक्टर एस. जयशंकर उद्या क्वालालंपूर इथं होणाऱ्या 20 व्या पूर्व आशिया शिखर परिषदेत पंतप्रधान मोदींचं प्रतिनिधित्व करणार आहेत. पूर्व आशिया शिखर परिषदेत हिंद-प्रशांत क्षेत्रातील शांतता, स्थिरता आणि समृद्धी यासमोरील आव्हानांवर चर्चा करण्याची आणि प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींवर विचार विनिमय करण्याची संधी भारताला मिळेल.

**मोबाईल-वैष्णव**

येत्या दोन वर्षात मोबाईल फोनच्या सर्व सुट्या भागांचं उत्पादन भारतात होईल असा विश्वास इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती-तंत्रज्ञान मंत्री आश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केला. ते काल नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होते. चित्रफीती किंवा ऑनलाईन सामुग्रीची सत्यता पडताळण्यासाठी एक चॅटबॉट देखील विकसित केला जात असून त्याच्या सहाय्यानं खोट्या सामुग्रीचा प्रसार रोखता येईल, असंही ते यावेळी म्हणाले. झोहो या देशात विकसित केलेल्या डिजीटल मंचावर बारा लाखांहून अधिक सरकारी कर्मचारी आल्याची माहीती वैष्णव यांनी दिली.

**शिवराजसिंह**

तामिळनाडूमधील रामनाथपुरम, शिवगंगा, थुथुकुडी आणि विरुधुनगर जिल्हे प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजनेत समाविष्ट असल्याचं केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हंटलं आहे. या प्रकल्पांतर्गत, शेतकऱ्यांना व्यापक लाभ देण्यासाठी 36 योजना एकत्रित केल्या जात असल्याचं वेल्लोर इथल्या शेतकऱ्यांशी संवाद साधताना त्यांनी सांगितलं. योजनेत सहभागी चार कृषी विज्ञान केंद्रांच्या प्रमुखांसमवेत त्यांनी योजनेच्या एकत्रीकरणाच्या प्रगतीचा आढावा घेतला. त्यात त्यांनी नैसर्गिक शेती पद्धती आणि डाळी उत्पादनात देशाला स्वावलंबी बनवण्याचा, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दृष्टिकोन प्रतिबिंबित करणाऱ्या, राष्ट्रीय डाळी अभियानावर भर दिला. तामिळनाडूसारख्या राज्यांना सुधारित वाण, प्रगत तंत्रज्ञान आणि खात्रीशीर विपणन या अभियानाचा मोठा लाभ होईल, असंही त्यांनी नमूद केलं.

**पंतप्रधान-जीएसटी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारनं नुकत्याच लागू केलेल्या जीएसटी दरातील सुधारणांमुळे आरोग्यसेवा क्षेत्रातील औषधं, उपकरणं आणि अत्यावश्यक सेवांच्या किमती कमी होऊन आरोग्यसेवा क्षेत्राला दिलासा मिळाला आहे. अत्यावश्यक औषधांवरील कर 12 टक्क्यांवरून 5 टक्के करण्यात आला आहे. 36 जीवनरक्षक औषधांना करातून पूर्णपणे सूट देण्यात आली असल्यामुळे दीर्घकालीन आणि गंभीर आजारांवरील उपचार आता अधिक परवडणारे झाले आहेत.

**सीबीएसई-सीटीईटी**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे म्हणजे सीबीएसईतर्फे घेण्यात येणारी केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेची म्हणजे सीटीईटी घोषणा करण्यात आली आहे. त्यानुसार नव्या वर्षात 8 फेब्रुवारी रोजी ही परीक्षा देशभरातील 132 शहरांमध्ये आयोजित केली जाणार आहे. सीबीएसईनं प्रसिद्धिपत्रकाद्वारे परीक्षेची माहिती दिली आहे. त्याच धर्तीवर राज्यस्तरावरील राज्य परीक्षा परिषदेतर्फे शिक्षक पात्रता परीक्षा आयोजित केली जाते. 8 फेब्रुवारी रोजी होणाऱ्या सीटीईटीमध्ये 2 पेपर असणार आहेत. एकंदर 20 भाषांमध्ये ही परीक्षा घेतली जाणार आहे. इच्छुक उमेदवारांनी ctet.nic.in या संकेतस्थळाला भेट देण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**मन की बात'**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 11 वाजता आकाशवाणीच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधतील. या कार्यक्रमाचा हा 127 वा भाग आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व प्रसारण सेवा आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब चॅनल वर कार्यक्रमाचं थेट प्रसारण होईल. हिंदी प्रसारणानंतर आकाशवाणी हा कार्यक्रम प्रादेशिक भाषांमध्ये प्रसारित करेल.

**उपराष्ट्रपती**

उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन आज सेशेल्सच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. तिथं ते सेशेल्सचे नवनिर्वाचित राष्ट्रपती डॉक्टर पॅट्रिक हर्मिनी यांच्या शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहतील. या भेटीदरम्यान ते दोन्ही देशांमधील घनिष्ठ आणि दीर्घकालीन संबंध पुन्हा दृढ करतील असं परराष्ट्र मंत्रालयानं दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे. भारताच्या व्हिजन महासागर अंतर्गत सेशेल्स हा एक महत्त्वाचा भागीदार आहे. सेशेल्स बरोबरची भागीदारी अधिक भक्कम आणि विस्तारित करण्याप्रती भारताची वचनबद्धता या भेटीतून अधोरेखित होते.

**यूक्रेनड्रोन**

यूक्रेनचे 121 ड्रोन आपण नष्ट केल्याचं रशियाच्या संरक्षण मंत्रालयानं एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे जाहीर केलं आहे. युक्रेननं रोस्तोव्ह, वोल्गोग्राड, ब्रायन्स्क, कलुगा, मॉस्कोसह इतर अनेक भागांमध्ये ड्रोनद्वारे हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता, मात्र रशियाच्या संरक्षण दलानं ते यशस्वीपणे परतवून लावल्याचं यात म्हटलं आहे. दरम्यान, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यातली पूर्वनियोजित शिखर परिषद पुढे ढकलण्यात आल्याचं रशियाचे राजदूत किरील दिमित्रीव्ह यांनी सांगितलं.

**शहा-निधन**

ज्येष्ठ विनोदी अभिनेते सतीश शहा यांचं काल मुंबईत मूत्रपिंड विकारानं निधन झालं. ते 74 वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर आज अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. 1972 मधे पुण्यातील फिल्म इंस्टीट्यूटमधून शिक्षण घेऊन ते अभिनय क्षेत्रात आले. दूरदर्शनवरील ये जो है जिंदगी या मालिकेतील त्यांची भूमिका विशेष लोकप्रिय झाली होती. जाने भी दो यारो, हम आपके है कौन, दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे अशा अनेक चित्रपटांमधल्या त्यांच्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र

फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विनोदी अभिनेते जॉनी लिव्हर यांच्यासह अनेक मान्यवरांनी सतीश शहा यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**क्रिकेट**

भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यान पन्नास षटकांचा तिसरा आणि अंतिम सामना भारतानं 9 गडी राखून जिंकला. प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियानं 236 धावा केल्या. भारताकडून हर्षित राणानं सर्वाधिक 4 गडी बाद केले. प्रत्युत्तरादाखल सलामीवीर रोहित शर्मा आणि विराट कोहली या जोडीनं केलेल्या नाबाद 168 धावांच्या जोरावर भारतानं 11 षटकं आणि 3 चेंडू राखून हा सामना जिंकला. रोहित शर्मानं 121 तर विराट कोहलीनं 74 धावा केल्या. आता दोन्ही संघांदरम्यान येत्या 29 ऑक्टोबरपासून कॅनबेरा इथं वीस षटकांच्या 5 सामन्यांच्या मालिकेला सुरुवात होणार आहे. दरम्यान महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना बांगलादेशविरुद्ध नवी मुंबईतल्या डी वाय पाटील मैदानावर होणार आहे. दुपारी 3 वाजता हा सामना सुरु होणार आहे. भारतीय महिला संघ यापूर्वीच उपांत्यफेरीत पोहोचला आहे.

**ॲथलेटीक्स**

रांची इथं सुरू असलेल्या चौथ्या दक्षिण आशिया ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये कालच्या पहिल्याच दिवशी पाच सुवर्ण पदकांसह भारतानं 15 पदकांची कमाई केली आहे. पुरुषांच्या पांच हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेमध्ये भारताच्या प्रिन्स कुमारनं देशाला या स्पर्धेतलं पहिलं सुवर्णपदक जिंकून दिलं. महिलांच्या पांच हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत भारताच्या संजना सिंग हिनं सुवर्ण, तर सीमानं रौप्य पदक मिळवलं. पुरुषांच्या गोळाफेक स्पर्धेमध्ये समरदीप सिंग गिल यानं सुवर्ण पदक पटकावलं. भारताच्या रवी कुमारनं दुसरा तर श्रीलंकेच्या स्पर्धकानं तिसरा क्रमांक पटकावला. महिलांच्या गोळाफेक स्पर्धेमध्ये भारताच्या योगितानं सुवर्ण तर शिखानं रौप्य पदक पटकावलं. महिलांच्या उंच उडी स्पर्धेमध्ये पूर्वा सावंतनं रौप्य पदक मिळवलं आहे.

**हवामान**

बंगालच्या उपसागरावरील कमी दाबाचा पट्टा उद्या सकाळी चक्रीवादळात रूपांतरित होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. मोंथा चक्रीवादळ मंगळवारी संध्याकाळी उशिरा आंध्र प्रदेश किनाऱ्यावरील काकीनाडाजवळ धडकण्याची शक्यता आहे. या वादळाच्या प्रभावामुळे आंध्र प्रदेश, ओडिशा आणि पश्चिम बंगालमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यानं राज्याच्या विविध भागात काल वादळी पाऊस झाला. उद्या सकाळपर्यंत, राज्याच्या बहुतांश भागात मुसळधार पावसाची शक्यता असून या काळात विदर्भ आणि मराठवाड्याचा काही भाग वगळता इतर सर्वत्र हवामान विभागानं पिवळा बावटा जारी केला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

## नमस्कार..